मिरा-भाईंदर महानगरपालिका

माहिती व जनसंपर्क विभाग

प्रसिद्ध पत्रक

## ❖ कामामध्ये बेजबाबदारपणा केलेल्या महानगरपालिकेच्या संबंधित अभियंता व शिपाई यांना तत्काळ नोटीसा बजावण्यात आल्या.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मुख्यालयात दिनांक ३० ऑक्टोबर २०२५ रोजी मा. आयुक्तांच्या दालना जवळील सभागृहात सर्व पक्षीयांनी RMC बाबत घेतलेल्या बैठकीत माजी महापौर मा. श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे यांना, पिण्यासाठी देण्यात आलेले पाणी दूषित असल्याचे निदर्शनास आले. याबाबत त्यांनी प्रसार माध्यमातून तक्रार केली होती. या घटनेची गंभीर दखल मिरा भाईंदर महानगरपालिका मा.आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांनी त्वरित घेतली असून तात्काळ संबंधित शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता व शिपाई यांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. सदर नोटिसींच्या अनुषंगाने प्राप्त होणा-या खुलाशावर नियमोचित कार्यवाही करणेबाबत मा. आयुक्त यांनी निर्देशित केले आहे.

तथापि आपल्या मिरा-भाईंदर शहरास स्टेम प्राधिकरण व एमआयडीसी ह्या प्राधिकरणाकडून पाणीपुरवठा होत आहे. सदरचा पाणीपुरवठा हा संबधित प्राधिकरणाकडून शुद्धीकरणाची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करूनच मिरा भाईंदर शहराला शुद्ध पाणीपुरवठा होत असतो.सदरचा पाणीपुरवठा शहरांमध्ये होत असताना त्यामध्ये टप्प्याटप्प्याने क्लोरीनेशन केले जाते. तसेच शहरांमध्ये पाणीपुरवठा करणाऱ्या जलकुंभामध्ये सुद्धा ॲडिशनल क्लोरीनेशन केले जाते. त्याचप्रमाणे फाटक मुख्य कंट्रोल व सर्व जलकुंभावर क्लोरीनेशन करून त्यांची वेळोवेळी तपासणी केली जाते.अशा प्रकारे शहरांमध्ये कायमच शुद्ध पाणीपुरवठा होत असतो.मिरा भाईंदर महानगरपालिका शहरात आणि कार्यालयात सुद्धा शुद्ध पाणी पुरवठा करण्यास कटिबद्ध आहे.